# सहसंचालक,तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय,नाशिक

शासकीय तंत्रनिकेतन परिसर, पोस्ट बॉक्स नं.२१९,
सामनगांव रोड,नाशिक रोड,नाशिक-४२२१०१
दूरध्वनी क्र.(०२५३) २४६१४७९, २४६०११४ फॅक्स-२४५५३०१


---

**टपाल दाखला घेवुन**

जा.क्र.तंशि/विकाना/आस्था/२०१४/ सरळसेवानियुक्ती /३३१०
दिनांक:- २९ डिसेंबर,२०१४

**नियुक्ती आदेश :**

सहसंचालक,तंत्रशिक्षण,विभागीय कार्यालय,नाशिक यांचे अधिनस्त असलेल्या शासकीय कार्यालये/ संस्थांतील शिपाई/ग्रंथालय शिपाई या पदांकरीता लेखी परीक्षा व मुलाखती आयोजित करण्यात आल्या होत्या. सदर परीक्षांच्या आधारे निवड झालेल्या खालील उमेदवारांस **गट-ड** संवर्गात **रुपये ४४४०-७४४० ग्रेड पे-रु.१३००/-** या वेतनश्रेणीत **रुपये ४४४०/-**या प्रारंभिक वेतनावर त्यांच्या नांवासमोर दर्शविलेल्या **शिपाई/ग्रंथालय शिपाई** या पदावर नामनिर्देशनाने तात्पुरत्या स्वरुपात खालील अटींच्या अधीन राहून नेमणुक देण्यात येत आहे.

| अ. क्र. | उमेदवाराचे नांव व पत्ता | मुळ प्रवर्ग | नियुक्तीचे पदनाम व संस्था/ कार्यालय | नियुक्तीचा प्रवर्ग |
|---|---|---|---|---|
| ०१ | श्री.ज्ञानेश्वर जनार्दन जगधाने,<br>मु.पो.लक्ष्मीनगर,स्टेशनरोड,पोलीस कॉलनी जवळ,राहुरी,ता.राहुरी.<br>जि.अहमदनगर -४१३ ७०५ | अ. जा. | **ग्रंथालय शिपाई,**<br>शासकीय तंत्रनिकेतन,<br>जळगांव,<br>जिल्हा पेठ, जळगांव | अ.जा.-सर्वसाधारण |
| ०२ | श्री.रोहीदास सुभाष देवरे,<br>हरी ओम नगर,मु.पो.मोराणे पी.एल.<br>ता.जि.धुळे -४२४ ००२ | इमाव | **शिपाई,**<br>शासकीय तंत्रनिकेतन,<br>नंदुरबार,<br>मौजे-होळ हवेली,<br>डुबकेश्वर मंदिरा जवळ,<br>नंदुरबार जि.नंदुरबार | इमाव-माजी सैनिक |

**अटी शर्ती खालीलप्रमाणे :**

०१. उपरोक्त उमेदवारांनी या आदेशाच्या दिनांकापासून जास्तीतजास्त १५ दिवसांच्या आत, त्यांना नेमणुक दिलेल्या पदावर सर्व मूळ प्रमाणपत्रांसह हजर होणे आवश्यक आहे. अन्यथा त्यांचा नियुक्तीवरील हक्क आपोआप संपुष्टात येईल व नियुक्ती आदेश रद्द समजला जाईल.

०२. उपरोक्त उमेदवारांची वरील संवर्गातील सेवाज्येष्ठता ही विहीत मुदतीत सदर पदावर हजर होण्यावर अथवा मुदतवाढीवर अवलंबून राहील.

०३. शासकीय सेवेत रुजू झाल्यापासुन उपरोक्त कर्मचा-यांची सेवा पुढील एक वर्ष समाधानकारक असेल तर त्यांची सेवा पुढे सुरु ठेवण्यात येईल. असमाधानकारक अहवाल प्राप्त झाल्यास कोणतीही पूर्वसूचना न देता त्यांची सेवा समाप्त करण्यात येईल.

०४. उपरोक्त उमेदवारांना सेवा सोडावयाची असल्यास एक महिन्याची नोटीस अथवा त्याऐवजी एक महिन्याच्या मूळ वेतनाइतकी रक्कम भरावी लागेल.

०५. सध्या अस्तित्वात असलेले रजेचे नियम व इतर शासकीय नियम संबंधितांना लागू असतील. तसेच वेळोवेळी होणा-या संबंधित नियमांच्या दुरुस्त्या बंधनकारक राहतील.

०६. उपरोक्त उमेदवारांनी नियुक्तीच्या जिल्हयातील शल्य चिकीत्सकांचे शारीरीक स्वास्थ प्रमाणपत्र तीन महिन्यांच्या आत सादर करावे ते प्रतिकुल आढळल्यास त्यांच्या सेवा तात्काळ संपुष्टात आणण्यात येतील.

०७. सदर उमेदवारांची सेवा ही चारित्र व पूर्वचारित्र पडताळणीच्या अनुकुल अहवालाच्या अधीन राहील. उमेदवाराचा संबंधीत प्राधिका-याकडून चारित्र व पूर्वचारित्र पडताळणीचा प्रतिकुल अहवाल प्राप्त झाल्यास, त्यांच्या सेवा तात्काळ समाप्त करुन, त्यांना सेवामुक्त करण्यात येईल.

०८. सेवेत रुजू होण्याकरीता प्रवासभाडे किंवा इतर कुठलाही भत्ता अनुज्ञेय राहणार नाही.

०९. संबंधीतांच्या सेवापुस्तकातील 'जन्मतारीख' याबाबतचा फेरफार करण्याचा अर्ज शासकीय सेवेत लागल्यापासून पाच वर्षांच्या कालावधीनंतर विचारात घेतला जाणार नाही.

१०. उपरोक्त उमेदवारांना गरज भासल्यास शासकीय नियमानुसार हमीपत्र द्यावे लागेल.

११. संबंधीतास प्रशिक्षणास पाठविल्यास जावे लागेल. तसेच प्रशिक्षणास जाण्यापूर्वी प्रशिक्षणाचा कालावधी पूर्ण केल्यानंतर या विभागात कमीत कमी ३ वर्षे सेवेत राहण्यांबाबतचे हमीपत्र द्यावे लागेल व कमीत कमी ३ वर्षे सेवेत रहावे लागेल. अन्यथा संबंधीतास प्रशिक्षणासाठी आलेला खर्च आणि विभागाने ठरविलेला दंड यांची प्रतिपुर्ती करावी लागेल.

१२. उपरोक्त उमेदवारांना शासनाने वेळोवेळी केलेले नियम व अटी बंधनकारक राहतील.

१३. त्यांची सेवा ही विभागीय कार्यालयाच्या अधिपत्याखालील असलेल्या कोणत्याही संस्थेत/कार्यालयात बदलीस पात्र असेल.

१४. मागासवर्गिय उमेदवारांना मागासवर्गिय उमेदवारांकरीता आरक्षित पदावर नेमणुक दिली असल्यास सामान्य प्रशासन विभाग,शासन निर्णय क्र.बीसीसी-२०११/प्र.क्र.१०६४/२०११/१६:ब,दि.१२.१२.२०११ मधील तरतुदीनुसार जात वैधता प्रमाणपत्र तपासण्याच्या अधिन राहून तात्पुरत्या स्वरुपात त्यांची नियुक्ती करण्यात येत आहे. त्यांनी रुजू होताच तात्काळ जात वैधता प्रमाणपत्र पडताळणीचा प्रस्ताव सादर करावा व ६ महिन्यांचे आत जात वैधता प्रमाणपत्र कार्यालयास सादर करावे.अन्यथा त्यांची नियुक्तीच्या पदावरील सेवा कोणतीही पूर्वसूचना न देता समाप्त करण्यात येईल.

१५. रुजू होतांना अथवा तदनंतर कोणत्याही क्षणी उमेदवाराने सादर केलेली प्रमाणपत्रे व माहिती खोटी असल्यास अथवा ज्या प्रमाणपत्राचे व माहितीच्या आधारे नोकरी मिळविली आहे ती माहिती चुकीची असल्याचे आढळून आल्यास त्यांची सेवा तात्काळ समाप्त केली जाईल व ते फौजदारी कार्यवाहीस पात्र ठरतील.

१६. उमेदवारांना शासन निर्णय क्रमांक सनिअ-१००५/१२६/सेवा-४, दिनांक ३१/१०/२००५ प्रमाणे परिभाषित अंशदान निवृत्ती योजना लागू राहील.

१७. उमेदवारांने शासन अधिसूचना एसआरव्ही २०००/प्रक्र (१७/२०००)/बारा, दिनांक. २८/०३/२००५ नुसार नमुना-अ नियम ४ प्रमाणे लहान कुटुंबाचे प्रतिज्ञापत्र रुजू होतांना सादर करावे व ते उमेदवारास बंधनकारक राहील.

१८. महिला आरक्षणांतर्गत ज्या महिला उमेदवारांची निवड करण्यात आलेली आहे.त्या उमेदवारांची मा.आयुक्त, महिला व बालकल्याण,पुणे यांचे अंतिम मान्यतेच्या अधिन राहून तात्पुरती नियुक्ती करण्यात येत आहे. संबंधीत विभागाकडुन सकारात्मक अहवाल प्राप्त झाल्यावरच त्या महिला उमेदवाराची नियुक्ती पुढे चालु ठेवण्यात येईल. नकारात्मक अहवाल प्राप्त झाल्यास कोणतीही पूर्वसूचना न देता संबंधीत महिला उमेदवाराची सेवा कोणत्याही पूर्वसूचने विना तात्काळ समाप्त करण्यात येईल.

१९. वरील अटी व शर्ती मान्य असल्यास सदर नियुक्ती आदेशाच्या दिनांकापासून १५ दिवसांचे आत वर नमूद केलेल्या ठिकाणी संबंधीत पदावर शैक्षणिक पात्रता, जन्मतारीख, जात, अनुभव इत्यादी तत्सम सर्व मूळ प्रमाणपत्रांसह हजर व्हावे. अन्यथा संबंधीतांचा नियुक्तीचा हक्क संपुष्टात येईल व सदर नियुक्ती आदेश रद्द समजण्यात येईल.

वर नमूद केलेल्या अटींच्या अधिन राहून सदर उमेदवारांची तात्पुरती नेमणुक करण्यात येत आहे. वरील अटी मान्य असल्यास, त्या मान्य असल्याचे रुपये १००/-च्या स्टॅम्प पेपरवर पंजीबध्द प्रतिज्ञापत्र संबंधीत कार्यालय प्रमुखाकडे उमेदवाराने हजर होतेवेळी सादर करावे.

(डॉ.दि.रा.नंदनवार)
सहसंचालक,
तंत्रशिक्षण,विभागीय कार्यालय,नाशिक

प्रत- माहिती व आवश्यक त्या कार्यवाहीसाठी रवाना
१.संबंधीत उमेदवार
२.मा. जिल्हा कोषागार अधिकारी,कोषागार कार्यालय, जळगांव/नंदुरबार यांना मानार्थ
३.प्राचार्य,शासकीय तंत्रनिकेतन,जळगांव/नंदुरबार.

त्यांना कळविण्यात येते की, आपल्या संस्थेमध्ये नियुक्ती देण्यात आलेल्या उमेदवारांना त्यांच्या नावासमोर दर्शविलेल्या पदावर हजर करुन घेतांना नियुक्ती आदेशातील अटी मान्य असल्याबाबतचे रुपये १००/-च्या स्टॅम्प पेपरवर पंजीबध्द प्रतिज्ञापत्र घेवुन अर्हतेबाबतच्या मूळ प्रमाणपत्रांची तपासणी करुन हजर करुन घेण्यात यावे. त्यांचे चारित्र व आरोग्य विषयक तपासणी व मागासवर्गीय उमेदवारांचे जात वैधतेबाबतच्या पडताळणीची कार्यवाही विहित मुदतीत करुन घेण्यात यावी तसेच विशेषतः अट क्र. ३,७,१५ बाबतची कार्यवाही कार्यालयीन स्तरावर विहीत मुदतीत करण्याची खबरदारी आपले स्तरावर घेण्यात यावी. व याबाबतचा संपूर्ण अहवाल वेळोवेळी या कार्यालयास सादर करावा.

४.निवड नस्ती.